पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन

# ज्ञानवर्धक, प्रेरणादायी चर्चासत्र

**नाशिक । दि. ९ प्रतिनिधी**

इंटरनॅशनल ॲडव्हर्टायझिंग असोसिएशन (आयएए) द्वारा नाशिक इंजिनिअरिंग कल्स्टर येथे आयोजित 'रिअल इस्टेट इन डिजिटल वर्ल्ड' या विषयाबरील चर्चासत्र ज्ञानवर्धक आणि डिजिटल व्यवसायाचे अंतरंग उलगडणारे ठरल्याची प्रतिक्रिया बांधकाम व्यवसायातील मान्यवरांनी व्यक्त केली.

## उपयुक्त चर्चासत्र



नाशिकमध्ये 'डिजिटाईज्ड वर्ल्ड' विषयावर प्रथमच चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्राच्या माध्यमातून बांधकाम व्यवसायातील नाविन्य आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर याबाबतच्या वैविध्यपूर्ण पैलूंना वक्त्यांनी स्पर्श केला. नाशिकच्या बांधकाम विश्वाला याचा निश्चित फायदा होईल. डिजीटल माध्यमांचा वापर रिअल इस्टेटमध्ये कसा करावा याची माहिती मिळाली तसेच त्यातील बारकावे समजून घेतले. – **जयेश ठक्कर,** अध्यक्ष , क्रेडाई

## ज्ञानवर्धक उपक्रम



देशातील वेगवान शहरांच्या यादीत स्थान मिळवलेल्या नाशिक शहराकडे सर्वांचे लक्ष असताना इंटरनेट जगताने त्याची केव्हाच दखल घेतल्याची आकडेवारी आजच्या चर्चासत्रात समोर आली. डिजिटाईज्ड विश्व उद्याचे भवितव्य आहे. हे ओळखून 'देशदूत' आणि क्रेडाईने आयोजित केलेला हा उपक्रम स्तुत्य आणि तितकाच ज्ञानवर्धक आहे. यामुळे बांधकाम व्यावसायिकांचे 'ब्रेनवॉशिंग' झाले. अशा उपक्रमांमुळे नाशिक देशाच्या नकाशावर जाण्यास मदत होईल.– **सुजॉय गुप्ता,** सम्राट ग्रुप

## प्रेरणादायी उपक्रम



सर्वार्थाने विकसित होत असलेल्या नाशिकला प्रतिष्ठा प्राप्त होत असताना यामध्ये बांधकाम व्यवसायाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. बांधकाम व्यवसायात डिजिटाईज्ड जगताचा अंतर्भाव यापुढे अटळ राहणार, ही काळ्या दगडावरील धवलरेखा आहे. भविष्यकालीन गरज ओळखून आयोजकांनी योग्य विषयाला घातलेला हात आमच्यासारख्या व्यावसायिकांना निश्चितच प्रेरणादायी ठरेल. यापुढे असे उपक्रम राबवण्यात यावेत, अशी विनंती सजग घटकांना करावीशी वाटते. – **अभय तातेड,** अनमोल नयनतारा समुह

## बाह्य जगताचा आढावा



डिजिटाईज्ड विश्वाचा सविस्तर आढावा घेताना सादर करण्यात आलेली आकडेवारी आमच्या ज्ञानात भर घालणारी ठरली. विशेषत: नाशिक संदर्भातील आकडे इथल्या विकासाचा पैलू उलगडणारे वाटले. चर्चासत्रात मार्गदर्शन करणाऱ्या वक्त्यांची ज्ञानाची खोली कौतुकास्पद होती. भविष्यात, अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्यास बांधकाम व्यावसायिकांच्या ज्ञानार्जनाचा तो एक भाग ठरेल. नाशिकसंदर्भात बाह्य जगतात काय चालले आहे, याचे ज्ञान प्राप्त झाले.

– **गौरव ठक्कर,** ठक्कर डेव्हलपर्स

